## निशाणी क्र.१८ वरिल आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांनी कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ होवुन कैफियत दाखल करण्यास परवानगी करीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी याचे अर्जातील कथन की, प्रस्तुतचा दावा अतिक्रमण काढुन ताबा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना दि. १६/०२/२०२३ रोजी दाव्याचे समन्स प्राप्त झाले. त्यानुसार दि. २३/०२/२०२३ रोजी न्यायालयात हजर झाले. प्रतिवादी यांनी लेखी जबाब दाखल करण्यास मुदतीचा अर्ज दाखल केला. परंतु, न्यायालयाने मुदतीचा अर्ज नामंजुर केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ ते ५ हे एकत्र कुटुंबात राहतात. प्रतिवादी क्र. ५ याची पत्नी नेहमी अजारी असते. ती दरम्यानच्या काळात अजारी असल्यामुळे व प्रतिवादी क्र. ४ च्या जवळच्या नातेवाईकांचे लग्न असल्यामुळे लेखी जबाब दाखल करु शकले नाही. त्यामुळे १४२ दिवसाचा विलंब झालेला आहे. सदर विलंब जाणुनबुजुण केलेला नाही. प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर शामिल न केल्यास नुकसान होणार आहे. याउलट वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही त्यामुळे कैफियत दाखल करण्यात झालेला विलंब माफ करुन विनाकैफियत चौकशीचा आदेश रद्द करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जावर खुलासा देवुन अर्जास हरकत घेतली आहे. वादी याचे म्हणणे असे आहे की, प्रतिवादी यांनी विलंबाकरीता योग्य ते संयुक्तिक कारण दिलेले नाही. तसेच अर्ज हा मुदतीबाहेर गेलेला आहे त्यामुळे अर्ज नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अर्जाचे व अभिलेखांचे सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले . वादीने प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना दाव्याचे समन्स दि.

१६/०२/२०२३ रोजी प्राप्त झाले आहे. तदनंतर सदर प्रतिवादी यांनी नि.क्र. १२ व १५ वर कैफियत दाखल करण्यास मुदतीचे अर्ज सादर केले व ते मंजुर करण्यात आलेले आहे. परंतु, नि.क्र. १५ वरील अर्ज मुदतीत कैफियत सादर न केल्यामुळे नामंजुर करण्यात आलेला आहे. सदर प्रतिवादी क्र. ५ हिच्या पत्नीचे वैद्यकीय उपचाराबाबतचे कोणतेही कागदपत्र अभिलेखावर सादर केलेले नाही. तसेच प्रतिवादी क्र. ४ याच्या जवळच्या नातेवाईकाचे नांव किंवा लग्नाची तारीख नमुद केलेली नाही. त्यामुळे, प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचा विचार करता अर्जातील कारण संयुक्तिक नाही.

५. परंतु, प्रस्तुतचा दावा जाहीर ठराव व अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी असल्यामुळे प्रतिवादी यांचे मौल्यवान हक्क हितसंबंध दाव्यामध्ये गुंतलेले आहेत. प्रस्तुत खटल्यामध्ये अद्यापपर्यंत पुराव्यास सुरुवात झालेली नाही. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना आपली मांडण्याची संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणारे नाही. याउलट दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. परंतु, प्रतिवादी यांनी केलेल्या विलंबा बाबत खर्चाचे आदेश पारित करुन अर्ज मंजुर करणे न्यायोचित ठरेल. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहेः-

## आदेश

अ. प्रस्तुतचा अर्ज रक्कम रु.५००/- खर्चाचे आदेश पारित करुन मंजुर करण्यात येतो.

ब. सदर खर्चाची रक्कम प्रतिवादी याने वादी यांना पुढील तारिख किंवा त्यापुर्वी अदा करावयाचे आहे.

क. प्रतिवादी यास कैफियत दाखल करण्यास झालेला १४२ दिवसांचा विलंब माफ करण्यात येवुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात येते.

दिनांक २६/०६/२०२४ (ए.एच.शेख)
२ रे सह दिवाणी न्यायाधिश क-स्तर, अकोट.